# राज्य सहकारी निवडणुक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
## जुनी मध्यवर्ती इमारत, तळ मजला, पुणे-४११००१

फोन नं.(०२०) २६०५०६४१ ई-मेल आयडी :- sceapune@gmail.com


जा.क्र.रासनिप्रा/कक्ष-११/ कृ.उ.बा.स. /जि.नि.अ./घोषित करणे/१३९३/२०२१. दिनांक:-१९/०४/२०२१.

वाचले :- १. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ अ (१) (अ) मधील तरतुद.

२. महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२०, दिनांक १४.३.२०२०.

३. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२०, दिनांक १६.४.२०२१.

४. या प्राधिकणाकडील आदेश जा.क्र. ८१४५/सन २०१७, दिनांक २.१२.२०१७.

५. महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (एक).

**प्रस्तावना :-**

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ कलम १४ अ (१) (अ) (१) मधील तरतुदीनुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूकांचे अधीक्षण, निदेशन व नियंत्रण करण्याची जबाबदारी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणावर सोपवलेली आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) (दुसरी सुधारणा) अधिनियम २०२० अनुसार कृषि उत्पन्न बाजार समिती संचालक मंडळ निवडणूकीमध्ये किमान १० आर क्षेत्र धारण करणाऱ्या शेतकऱ्यां ऐवजी बाजार क्षेत्रात कार्य करणाऱ्या कृषि पतसंस्था/ बहुउद्देशीय सहकारी संस्था व ग्रामपंचायत सदस्यांना मतदानाचे अधिकार प्राप्त झालेले आहेत.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) (पहिली सुधारणा) नियम २०२० अनुसार नियम २ चे खंड ८ मधील "जिल्हाधिकारी किंवा यथास्थिती" हा मजकुर वगळण्यात आलेला आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम २ (८) मध्ये "जिल्हा निवडणूक अधिकारी" ची व्याख्या विषद केलेली आहे. सदर व्याख्येनुसार जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून "जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था" या दर्जा पेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याची नेमणूक करणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी, प्राधिकरणाने वाचावे क्रमांक ४ च्या आदेशानुसार राज्यातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्याकरीता संबंधीत जिल्हयातील जिल्हाधिकारी यांना "जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.)" म्हणून घोषित केलेले आहे.

ज्या अर्थी, महाराष्ट्र कृषि उत्पन्न बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम २०१७ चे नियम ३ (एक) मधील तरतुदीनुसार कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्यासाठी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.ब.स.) यांची नेमणूक करण्याचे अधिकार राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणास प्राप्त आहेत.

त्या अर्थी, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाच्या पर्यवेक्षणाखाली व नियंत्रणाखाली जिल्हयातील किंवा प्रदेशातील कृषि उत्पन्न बाजार समित्यांच्या निवडणूका घेण्यासाठी राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरणाला त्यांची कार्ये पार पाडतांना सहाय्य करण्याकरीता प्राधिकरण जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.ब.स.) नेमणूकी संदर्भात खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

-:: आदेश ::-

महाराष्ट्र कृषि उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम १९६३ चे कलम १४ (अ) (१) व महाराष्ट्र कृषि उत्पन्न् बाजार समित्या (समितीची निवडणूक) नियम ३ (एक) मधील तरतुदी अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करुन प्राधिकरण वाचले क्रमांक ४ चे आदेश रद्द करुन खालील अनुसूचीतील स्तंभ क्रमांक २ मधील अधिकाऱ्यांची स्तंभ क्रमांक ३ कार्यक्षेत्रातील बाजार समित्यांच्या निवडणूकांकरीता जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.ब.स.) म्हणून नेमणूक करीत आहे.

-:: अनुसूची ::-

| अ.क्र. | अधिकारी | कार्यक्षेत्र |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा ठाणे | ठाणे जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या आणि मुंबई कृषि उत्पन्न बाजार समिती |
| २ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा पालघर | पालघर जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा रायगड | रायगड जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा रत्नागिरी | रत्नागिरी जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सिंधुदूर्ग | सिंधुदूर्ग जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा पुणे (ग्रामीण) | पुणे जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सातारा | सातारा जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा कोल्हापूर | कोल्हापूर जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |

| | | |
|---|---|---|
| ९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सांगली | सांगली जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा सोलापूर | सोलापूर जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ११ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नाशिक | नाशिक जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अहमदनगर | अहमदनगर जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा जळगांव | जळगांव जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा धुळे | धुळे जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नंदूरबार | नंदूरबार जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा औरंगाबाद | औरंगाबाद जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा जालना | जालना जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १८ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा परभणी | परभणी जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| १९ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा हिंगोली | हिंगोली जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २० | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा लातूर | लातुर जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २१ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा नांदेड | नांदेड जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २२ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा उस्मानाबाद | उस्मानाबाद जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २३ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा बीड | बीड जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २४ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अमरावती | अमरावती जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २५ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा यवतमाळ | यवतमाळ जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २६ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा अकोला | अकोला जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २७ | जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, जिल्हा वाशिम | वाशिम जिल्हयातील कृषि उत्पन्न बाजार समित्या |

| | | |
|---|---|---|
| २८ | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा बुलढाणा | बुलढाणा जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| २९ | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा नागपूर | नागपूर जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ३० | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा वर्धा | वर्धा जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ३१ | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा चंद्रपूर | चंद्रपूर जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ३२ | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा गडचिरोली | गडचिरोली जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ३३ | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा गोंदीया | गोंदीया जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |
| ३४ | जिल्हा उपनिबंधक,<br>सहकारी संस्था, जिल्हा भंडारा | भंडारा जिल्हयातील<br>कृषि उत्पन्न बाजार समित्या |

**मा. आयुक्त राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या मान्यतेने.**

राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

२३/०४/२०२१

(यशवंत गिरी)
सचिव,
राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रति,

१. जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था (सर्व) (मुंबई १,२,३ व ४ वगळून)
२. जिल्हाधिकारी (सर्व) (मुंबई वगळून)

यांना कळवण्यात येते की, त्यांनी आपलेकडील कृषि उत्पन्न बाजार समिती निवडणूक संदर्भातील धारिका, निवडणूक निधी जिल्हा निवडणूक अधिकारी (कृ.उ.बा.स.) तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था यांच्याकडे वर्ग करुन तसा अहवाल प्राधिकरणास सादर करावा.

**प्रत माहितीस्तव :-**

१. मा. अतिरिक्त मुख्य सचिव (सहकार), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. मा. प्रधान सचिव (पणन), सहकार, पणन व वस्त्रोदयोग विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. मा. पणन संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**प्रत पुढील कार्यवाहीस्तव :-**

सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती (सर्व)